**नियमीत दिवाणी दावा क्र २०८/२०२३**
**संजय वि भिमराव**

## <u>निशाणी ९१ खालील आदेश</u>

1. नगर परिषद, कुर्डुवाडी यांचे मुख्य अधिकारी किंवा माहितगार इसम नगर परिषद, कुर्डुवाडी यांना सिटी सर्व्हे क्र १३५० संदर्भातील कागदपत्र घेवून साक्षीकामी बोलविण्यात यावे या मागणीसाठी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीकडुन दाखल करण्यात आलेला आहे.

2. प्रतिवादीचे अर्ज कथन की, अर्जात नमूद अधिकारी यांची साक्ष नोंदविणे आवश्यक आहे. तसेच साक्षीदाराचा साक्षीभत्ता भरण्यास प्रतिवादी तयार असून, अर्जात नमूदप्रमाणे कागदपत्र साक्षीदारासोबत साक्षीकामी बोलविणे आवश्यक आहे तरी प्रस्तुत अर्ज मागणीप्रमाणे मंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादीकडुन करण्यात आलेली आहे.

3. वादीचे वतीने सदर अर्जावर म्हणणे सादर करुन प्रखर विरोध व हरकत दर्शविली आहे की, प्रतिवादी अर्जात नमूदप्रमाणे ज्या मिळकतीचे कागदपत्र साक्षीकामी साक्षीदारासोबत घेवून यावे असे म्हणत आहेत ती कागदपत्र दावा विषयाशी संबंधीत नाही. वादीने सिसनं १३५० वर परवानगी घेवून घरकुल बांधलेले आहे. सिटी सर्व्हे क्र १३५५ ही दाव्यातील मिळकत आहे. वादीने सिसनं १३५० मध्ये अतिक्रमण करुन घर बांधले आहे अशी केस प्रतिदाव्यात प्रतिवादीची नाही. प्रतिवादीचे बांधकाम हे विनापरवाना असल्याबाबतचे कागदपत्र प्रकरणात निशाणी ६६ वर पूर्वीच दाखल आहे. त्यामुळे अर्जात नमूद सिसनं १३५० वादमिळकत नसल्यामुळे त्याची कागदपत्रे मागविणे कोणताही औचित्त नाही. केवळ कामकाम लांबविण्यासाठी अर्ज केला असल्यामुळे तो फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

4. दोन्ही पक्षांचे युक्तीवाद ऐकला. तसेच निशाणी ५४ वर निश्चित असलेले मुद्दे याचे वाचन केले. दावा कलम १ मधील मिळकत नमूद वर्णनात सिटी सर्व्हे नंबर १३५० हा उत्तर बाजुस असल्याचा संदर्भात वादपत्रात दिसून येत असून, वादपत्र परिच्छेद क्र २ ते ६ मध्ये देखील सदर मिळकतीचा वारंवार संदर्भ दिसून येत असून, प्रतिवादीचा प्रतिदावा निशाणी २० यातील वादी विरुद्ध असलेली मागणी यासह परिच्छेद क्र ३ मध्ये पक्षकथनाचे बारकाईने वाचन करता अर्जात नमूदप्रमाणे साक्षीदाराची साक्ष अंतिम निर्णय गुणवत्तेवर होण्यासाठी आवश्यक व गरजेचे दिसून येत असल्याने वादीच्या वतीने उपस्थित केलेला आक्षेप बाजुला सारण्यात आला. परिणामी, अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

1. अर्ज मागणीप्रमाणे मंजूर.
2. अर्जात नमूदप्रमाणे साक्षीदारास साक्षी समन्स जारी करण्यात यावे.
3. अर्जदार प्रतिवादीने साक्षीदाराचा साक्षीभत्ता आजरोजी न्यायालयात जमा करावा.
4. साक्षीभत्ता जमा केल्यानंतर साक्षी समन्स तयार करण्यात यावे.

KARADE RATILAL MACHINDRA

Digitally signed by KARADE RATILAL MACHINDRA
Date: 2025.09.23 13:17:17 +0530

स्थळ : माढा. ( आर एम कराडे )

दिनांक : २३-०९-२०२५. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, माढा.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order is same word to word as per the original order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Nagesh N. Konda, Grade II |
| (b) | Court | : | CJSD, Madha. |
| (c) | Order signed by P.O. on | : | 23 September, 2025. |
| (d) | Order uploaded on | : | 23 September, 2025. |